पुढारी

# ‘दूरशिक्षण’ विभाग पदवी प्रथम वर्षास यंदा मान्यता मिळेल

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण विभागास पूर्णवेळ संचालक नसल्याने यूजीसीने मान्यता नाकारली होती. विद्यापीठाने व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने जाहिरात प्रसिद्ध करून पूर्णवेळ संचालक नियुक्तीबरोबर गतवर्षीच्या अन्य त्रुटींची पूर्तता केली आहे. दूरशिक्षण पदवी प्रथम वर्षाच्या मान्यतेसाठी परिपूर्ण अर्ज विद्यापीठ भरणार आहे. त्यामुळे यंदा दूरशिक्षण पदवी प्रथम वर्षाला मान्यता मिळेल, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

विद्यापीठाच्या स्थापनेपासून दूरशिक्षणला पूर्णवेळ संचालकपद दरवर्षी भरले जाते. यूजीसीने चालू शैक्षणिक वर्षात नवीन नियम लागू करीत पदवी प्रथम वर्षाची मान्यता रद्द केली. परंतू दूरशिक्षणच्या सर्व विद्यार्थ्यांना सर्व कॉलेजमधील नियमित वर्गात प्रवेश देण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले नाही. यंदाच्या शैक्षणिक वर्षात पदवी प्रथम वर्षाला मान्यता मिळविण्यासाठी जून ते जुलै महिन्यात ऑनलाईन अर्ज भरावा लागणार आहे.

ऑनलाईन अर्जाची छाननी करून त्रुटींची पूर्तता करण्याच्या सूचना केल्या जातील. त्यानंतर यूजीसीकडून नवीन शैक्षणिक वर्षातील पदवी प्रथम वर्षाला मान्यता दिली जाईल, असे कुलगुरुंनी सांगितले.

2 ४ MAY 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवात सहभागी व्हावे

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील : शिवाजी विद्यापीठात प्राचार्यांची बैठक

**कोल्हापूर, ता. २७ :** स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवात सहभागी होणे, हे नागरिकांचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या बैठकीत ते बोलत होते. न्यू कॉलेजमध्ये बैठक झाली.

डॉ. पाटील म्हणाले, ''स्वतंत्र भारताचा अमृतमहोत्सव साजरा करत आहोत. महोत्सवात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे.''

शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य व अमृतमहोत्सव समितीच्या अध्यक्ष डॉ. भारती पाटील यांनी महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर कोणकोणत्या उपक्रमांद्वारे आपण स्वातंत्र्याची मूल्ये विद्यार्थ्यांपर्यंत पोचवू शकतो, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सर्व महाविद्यालयांनी येणाऱ्या पर्यावरणदिनी वृक्षारोपण व स्वातंत्र्यदिनी देशभक्तिपर गीतांचा कार्यक्रम घेणे यासारख्या विविध उपक्रमांविषयी माहिती सांगितली. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रकाश कुंभार यांनी नव्या शैक्षणिक धोरणातील संकल्पना ''विद्यापीठ-सांस्कृतिक ऊर्जा केंद्र'' यासाठी आवश्यक असणाऱ्या विद्यापीठाच्या आराखड्याविषयी माहिती दिली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे जिल्ह्यातील महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या बैठकीत बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. शेजारी डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. अभय जायभाये, विलास सोयम, डॉ. प्रकाश कुंभार आदी.**



उपकुलसचिव विलास सोयम यांनी प्राचार्यांच्या अकॅडेमिक ऑडिटबाबत माहिती दिली तर राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. अभय जायभाये यांनी उपक्रमात कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी यांचा सहभाग कशा प्रकारे वाढवू शकतो, याबद्दल माहिती दिली.

प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी आभार मानले. डॉ. मनीषा नायकवडी व प्रा. अभिषेक श्रीराम यांनी सूत्रसंचालन केले.

लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमांतर्गत पंजाबच्या संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या ५१ विद्यार्थ्यांचा संघ शुक्रवारी कोल्हापुरात दाखल झाला. (छाया : नसीर अत्तार)

# पंजाबचे विद्यार्थी शिवाजी विद्यापीठात दाखल

## कोल्हापुरी परंपरेनुसार आज होणार स्वागत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आजादी का अमृतमहोत्सव आणि शिवाजी विद्यापीठाच्या हीरक महोत्सवानिमित्त विद्यापीठामार्फत सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रम होणार आहे. त्या अंतर्गत लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी पंजाबच्या संस्कृतीचे दर्शन लोकनृत्य, विविध कलांच्या सादरीकरणातून घडविणार आहेत. या विद्यार्थ्यांचा संघ शुक्रवारी रात्री आठच्या सुमारास कोल्हापुरात दाखल झाला.

येथील श्री छत्रपती शाहू महाराज टर्मिनसमध्ये कोयना एक्स्प्रेसने विद्यार्थ्यांचे आगमन झाले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आणि सहायक अधीक्षक सुरेखा आडके यांनी त्यांचे स्वागत केले. विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृहात या विद्यार्थ्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. आज, शनिवारी सकाळी नऊ वाजता कोल्हापुरी परंपरेनुसार या विद्यार्थ्यांचे स्वागत केले जाणार आहे.

तरुण भारत

# पंजाबचा संघ विद्यापीठात दाखल

कोल्हापूर : पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचा संघ शुक्रवारी सायंकाळी शिवाजी विद्यापीठामध्ये दाखल झाला. ३१ मे पर्यंत हा संघ विद्यापीठातील विविध कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहे. तसेच पंजाबचा संघ ३० व ३१ मे रोजी पंजाबची ओळख असणारे विविध कलाविष्कार सादर करणार आहे. कोल्हापूर परिसरातील विविध ठिकाणी भेटी देऊन ऐतिहासिक, सांस्कृतिक परंपरांचा अभ्यास करणार आहे. या संघात ३५ विद्यार्थी, १४ तज्ज्ञ प्रशिक्षक आणि २ प्रतिनिधी असा ५१ जणांचा समावेश आहे. येथील चार दिवसांच्या वास्तव्यादरम्यान हे विद्यार्थी शिवाजी विद्यापीठ परिसरासह कणेरी मठ, न्यू पॅलेस, भवानी मंडप, अंबाबाई मंदिर, महाद्वार रोड, मोतीबाग तालीम, कोल्हापुरी चप्पल लाईन, रंकाळा आदी ठिकाणी भेटी देणार आहे. तसेच ३० व ३१ मे रोजी कव्वाली, त्रिवेणी लोकसंगीत, झुमर, लोकनृत्य, भांगडा यांसारखे विविध कलाविष्कार सादर करणार आहे. यातून कोल्हापूरकरांना पंजाबच्या लोककलेची, लोकपरंपरेची आणि संस्कृतीची ओळख होईल.